**मा.प्रधान सचिव (पर्यावरण) तथा अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ याच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबई सीपीआयए ॲक्शन प्लान बाबतची दि.15.05.2015 रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन येथे झालेल्या पर्यावरण कृती आराखडा आढावा बैठकीचे इतिवृत**

------

मा.प्रधान सचिव (पर्यावरण) तथा अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दि.15.05.2015 रोजी म.प्र.नि.मंडळ, मुख्यालय, सायन, मुंबई येथे टीटीसी इंडस्ट्रिअल, क्लस्टर नवी मुंबई पर्यावरण कृती आराखडा अंमलबजावणीसंबंधी आढावा बैठक घेण्यात आली. सदर बैठकीत उपस्थित असलेले अधिकारी व उद्योगाचे प्रतिनिधी, तसेच संबंधित शासकीय प्रतिनिधी यांची यादी सोबत जोडली आहे.

सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी प्रस्ताविक केले त्यामध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरण विषयक कृती आराखडयाच्या गुणवत्तेच्या आधारे महाराष्ट्रातील पाच शहरे - तारापूर, चंद्रपूर, नवी मुंबई, औरंगाबाद, डोंबीवली, कल्याण ही अति प्रदुषित असल्याचे नोव्हेंबर, 2009 मध्ये घोषित करण्यात आले. नवी मुंबई शहराचा पर्यावरण विषयक प्रदूषण निर्देशांक ठरवितांना हवा प्रदूषणावर भार देण्यात आल्याचे सांगितले. सदस्य सचिव यांनी पर्यावरण विषयक कृती आराखडा संदर्भात सविस्तर माहिती सांगितली. तसेच कृती आराखडयाची गुणवत्ता काढतांना हवा, पाणी, जमीन हे मुद्दे केंद्र स्थानी असल्याबाबत सांगितले. वर्ष 2010 मध्ये केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने चंद्रपूर शहर व्यतिरिक्त इतर प्रदुषित शहरांवर उद्योगांच्या बंदीची अट काढून टाकल्याचे सांगितले. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मडळाने 2013 साली पुन्हा प्रदुषित शहराची यादी प्रसारित केलेली होती.

सह संचालक (हप्रनि), म.प्र.न.मंडळ यांनी नवी मुंबई क्लस्टरच्या पर्यावरण विषयक कृती आराखडयासंदर्भात सादरीकरण केले.

सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी सादरीकरणादरम्यान उपस्थित केलेले मुद्दे

- नवी मुंबई परिसरातील उद्योगांनी प्रदुषणाचे प्रमाण कमी करण्यासंदर्भात करावयाच्या उपाययोजनांमध्ये उपलब्ध नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन हवा, पाणी व घातक घनकचरा यांपासून होणारे प्रदूषणाचे प्रमाण कमी करणे.

- नवी मुंबई महानगरपालिका करीत असलेल्या रस्त्याच्या दुरुस्ती व सुधारणांच्या कामास लागणारा कालबध्द कार्यक्रम महानगरपालिकेने म.प्र.नि.मंडळास कळवावा.
- ज्या ठिकाणी हवेची गुणवत्ता मोजण्याचे स्थानके कार्यान्वित आहेत, त्या परिसरातील रस्त्यांची कामे महानगरपालिकेने प्राधान्याने पूर्ण करावीत.
- नवी मुंबई महानगरपालिकेने जेथे बांधकाम चालु आहे, अशा ठिकाणी धुलिचे प्रमाण कमी करण्यासाठी सभोवताली बॅरिअर्स, पत्रे लावावीत व अन्य उपाययोजनांचा वापर करावा.
- नवी मुंबई परिसरातील दगडखाणी यांना हवा प्रदुषणाची पातळी कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना जशा - " पाणी फवारणी यंत्रणा, डस्ट कलेक्टर, हवा प्रतिबंधक भिंत, मेटॅलिक रोड, वृक्षारोपण " देऊन त्याची अंमलबजावणी करण्यासाठी दोन महिन्यांचा कालवधी द्यावा.
- नवी मुंबई परिसरातील धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रीन बेल्ट डेव्हलपमेंट हा उपक्रम हाती घेणे,

नवी **मुंबई ॲक्शन प्लानमधील दीर्घ काळ व अल्पकाळाच्या उपाययोजनांबाबत उपस्थित प्रतिनिधींची चर्चा**

१ टीबीआयए इंडस्ट्रिअल असोसिएशन, नवी मुंबई - टीबीआयए प्रतिनिधींनी नवी मुंबई परिसरातील उद्योगांनी ॲक्शन प्लान अंमलबजावणीसाठी प्रयत्न केलेले आहेत. त्यामध्ये औद्योगिक सांडपाण्याच्या निर्मितीमध्ये घट करणे, हवेची गुणवत्ता - VOC, $SO_2$, $CO_2$ च्या पातळीमध्ये घट केलेली आहे. घातक घनकचरा निर्मितीमध्ये घट करणे. बैठकीदरम्यान मे.नवी मुंबई औद्योगिक परिसरातील 135 उद्योग बंद असल्याची माहिती दिली. नवी मुंबई औद्योगिक परिसरात वृक्षारोपणाचे काम हाती घेतलेले आहे. बैठकीदरम्यान त्यांनी विनंती केली की, ॲक्शन प्लॉन बाबतची आढावा बैठक दरमहा घेण्याची विनंती केली.

२ नवी मुंबई महानगरपालिका - प्रतिनिधींनी नवी मुंबई औद्योगिक परिसरामध्ये 136 कि.मी रस्त्याचे देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेतलेले आहे. त्यामध्ये 95 कि.मी. रस्त्याचे काम सुरु झाल्याचे सांगितले. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या प्रतिनिधींना रस्त्याची दुरुस्ती व देखभाल किती कालावधीत होईल, याचा कालबध्द कार्यक्रम मंडळास 7 दिवसांत देण्यास सांगितले. जेणेकरुन नवी मुंबई औद्योगिक परिसरातील रस्त्यांमुळे

होणारे परिसरातील धुळीचे प्रमाण कमी होईल. तसेच रस्त्याचे बांधकाम पावसाळा सुरु होण्यापूर्वी पूर्ण करण्याकरिता प्रयत्न करावे, अशा सूचना दिल्या.

३ महानगर गॅस प्रतिनिधी - प्रतिनिधींने टीटीसी एमआयडीसी परिसरात पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण केल्याचे सांगितले. सद्य:स्थितीत 40 उद्योग नॅचरल गॅसचा वापर करीत असल्याचे नमुद केले. चर्चेदरम्यान सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी मोठे उद्योग व कोळसा हे इंधन वापर करणारे उद्योग प्रथम प्राधान्याने नॅचरल गॅसचा वापर करण्यास निर्देश देण्यात यावेत. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी राष्ट्रीय हरित लवाद, पुणे येथील प्रकरणामध्ये नवी मुंबई प्रदूषणाची दखल घेतली .तसेच नवी मुंबई परिसरातील उद्योगांनी पीएनजी, सीएनजी चा वापर करावा असे मत व्यक्त केले. या संदर्भात सह संचालक (हप्रनि), महानगर गॅस, टीबीआयए, दगड खाण उद्योग प्रादेशिक अधिकारी-नवी मुंबई यांनी वेळोवेळी आढावा बैठक घ्यावी.

४ प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) -

प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पीयुसी प्रमाणपत्राचे मानकांचे उल्लंघन केलेल्या 4500 पैकी 1600 वाहनांवर दंडात्मक कारवाई केल्याचे कळविले. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी वाहतुकीमुळे होणाऱ्या प्रदुषणाबाबत प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत कोणत्या उपाययोजना करतात याची माहिती द्यावी. सदर बैठकीमध्ये प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी सीएनजी स्टेशन आऊटलेट संख्या वाढविणे, तसेच ॲटो रिक्षा व बसेस मध्ये सीएनजीचा वापर करणे, असे उपाय सुचविले. नवी मुंबई टीटीसी परिसरात CEPI ॲक्शन प्लान लागु झाल्यामुळे नवी मुंबई येथील सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनांमध्ये सीएनजी इंधनाचा वापर करण्यास प्रादेशिक परिवहन विभागास निर्देश देण्याचे प्रस्तावित आहे.

५ औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय (DISH) - प्रतिनिधींनी उद्योगामध्ये काम करणाऱ्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत वेळोवेळी म.प्र.नि.मंडळास अहवाल सादर करावा.

6 दगड खाण - यांच्या प्रतिनिधींनी नवी मुंबईतील सर्व दगडखाणी हे सिडको, एमआयडीसी व वन विभाग यांच्या जमिनीवर कार्यरत असल्याचे सांगितले. सिडकोच्या जागेवर कार्यरत असणाऱ्या दगडखाणीनी केलेल्या उपाययोजना - पाणी फवारणी यंत्रणा, मेटॅलिक रस्ते, हवा प्रतिबंधक भिंत उभारणे, झाडे लावणे. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी सर्व दगडखाणीनी त्यांच्या उपलब्ध असलेल्या जमिनीवर खालील उपाययोजना करुन अहवाल सादर करण्याबाबत निर्देश दिले.

अ. वृक्षारोपण,

ब. दोन पत्र्याचा वापर करुन दगडखाणींना आच्छादन करणे,

क. निरीच्या साहाय्याने केमिकल स्प्रेची उपाययोजना करणे, हे सर्व कालबध्द कार्यक्रमाव्दारे पूर्ण करणे. (Dust Suppression System)

दगडखाण असोसिएशनने गौण खनिज विभागास हरित पट्टा तयार करण्यासाठी निधी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा, त्याची प्रत म.प्र.नि.मंडळास सादर करावी.

७ महाराष्ट्र औद्योगिक वसाहत महामंडळ -

अ. एमआयडीसीच्या प्रतिनिधींनी नवी मुंबई टीटीसी परिसरातील पाण्याच्या वापरासंबंधी 15 दिवसांत अहवाल सादर करावा.

ब. एमआयडीसी परिसरातील सांडपाणी वाहतूक नेणाऱ्या पाईप लाईनची दुरुस्ती व देखभाल वारंवार करुन त्याचा अहवाल मंडळास सादर करावा.

क. सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी निर्देश दिल्याप्रमाणे, एमआयडीसी परिसरातील रस्ते, ग्रीन बेल्ट डेव्हलपमेंटचे काम हाती घेण्यात यावे. तसेच एमआयडीसी परिसरातील मोकळया जागेवर ग्रीन बेल्ट डेव्हलमेंट करावी.

**सदर बैठकीच्या अनुषंगाने, प्रधान सचिव, पर्यावरण तथा अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ यांनी सीईपीआय ॲकशन प्लानची अंमलबजावणी सर्व संबंधित सहभागीदार यांच्याकडून माहिती घेतली. नवी मुंबई पर्यावरणीय कृती आराखडा संदर्भात झालेल्या सादरी करणाच्या अनुषंगाने, नवी मुंबई परिसरातील उद्योगांनी कोळशाचा वापराऐवजी नॅचरल गॅस चा वापर करावा. तसेच अल्प व दीर्घ कालीन उपाययोजना याची काटेकोर अंमलबजावणी करुन नवी मुंबई, टीटीसी एमआयडीसी परिसराचा सेपी स्कोर (गुणांकन) कमीत कमी ठेवण्यासाठी खालील अल्प व दीर्घ कालीन कार्यक्रमाव्दारे प्रदूषण कमी करण्यास सहाय्य करावे. तसेच सर्व संबंधित औद्योगिक असोसिएशन, एमआयडीसी, महानगर गॅस, दगड खाण, नवी मुंबई महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन अधिकारी, औद्योगिक आरोग्य व सुरक्षा विभाग यांची सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांच्या अध्यक्षतेखाली दरमहा दुसऱ्या गुरुवारी सेपी ॲक्शन प्लान बाबत बैठक घेण्यात यावी . मा.अध्यक्ष,**

म.प्र.नि.मंडळ यांच्या स्तरावर तीन महिन्यामध्ये आढावा बैठक घेण्याचे निश्चित केले. तसेच तक्त्यामध्ये उपस्थित केलेले मुद्दे व त्याबाबतची कार्यवाही संबंधीत विभागाने करावी, असे आदेश दिले. (कार्यवाहीचा तक्ता सोबत जोडला आहे)

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष, म.प्र.नि.मंडळ | सदस्य सचिव<br>Member-Secretary,<br>Maharashtra Pollution<br>Control Board,<br>Mumbai-400022. | सह-संचालक (हप्रनि)<br>V. M. MOTGHARE<br>Joint Director (Air Pollution Control) |

### सी.ई.पी.आय.ची गुणवत्ता कमी करण्यासाठी संबंधित विभागाने करावयाची कामे

| अ. क्र. | बैठकीत उपस्थित झालेले मुद्दे | विभागाने करावयाची कारवाई | संबंधित विभाग |
|---|---|---|---|
| १ | अ. एमआयडीसीच्या प्रतिनिधींनी नवी मुंबई टीटीसी परिसरातील पाण्याच्या वापरासंबंधी अहवाल सादर करण्याबाबत<br><br>ब. एमआयडीसी परिसरातील सांडपाणी वाहतूक नेणाऱ्या पाईप लाईनची दुरुस्ती व देखभाल | एमआयडीसीच्या प्रतिनिधींनी नवी मुंबई टीटीसी परिसरातील पाण्याच्या वापरासंबंधी 15 दिवसांत अहवाल सादर करावा.<br><br>एमआयडीसी परिसरातील सांडपाणी वाहतूक नेणाऱ्या पाईप लाईनची दुरुस्ती व देखभाल वारंवार करुन त्याचा अहवाल मंडळास 15 दिवसांत सादर करावा. | एमआयडीसी |
| २ | ग्रीन बेल्ट डेव्हलमेंट करणे | सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ यांनी निर्देश दिल्याप्रमाणे, एमआयडीसी परिसरातील रस्ते, ग्रीन बेल्ट डेव्हलपमेंटचे काम हाती घेण्यात यावे. तसेच एमआयडीसी परिसरातील मोकळया जागेवर ग्रीन बेल्ट डेव्हलमेंट करावी. | एमआयडीसी/संबंधीत उद्योग |
| ३ | अ. वाहतुकीमुळे होणारे प्रदूषणाबाबतची उपाययोजना<br>ब. कालबाहय वाहनांचा वापर टाळणे | सीएनजी स्टेशन आऊटलेट संख्या वाढविणे, तसेच अॅटो रिक्षा व बसेस मध्ये सीएनजीचा वापर करणे,<br>वाहनांची पि.यु.सी.नियमित प्रमाणात करुन,जी वाहने पि.यु.सी.च्या नियमापेक्षा जास्त धूर सोडत असतील त्या वाहनांना महानगरपालिकेच्या हद्दीत प्रवेश नाकारण्यात यावे. | प्रादेशिक परिवहन विभाग/महानगर गॅस लि. |
| ४ | एमआयडीसी परिसरातील | नवी मुंबई महानगरपालिकेने | नवी मुंबई |

| | | | |
|---|---|---|---|
| | रस्त्यांची देखभाल व दुरुस्ती | रस्त्याची दुरुस्ती व देखभाल किती कालावधीत होईल, याचा कालबध्द कार्यक्रम मंडळास 7 दिवसांत देणे. | महानगरपालिका |
| ५ | वाहतुकीमुळे धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाययोजना | 1. नवी मुंबई महानगरपालिका, एमआयडीसी यांनी वृक्षारोपण कार्यक्रम हाती घेणे<br>2. हवेची गुणवत्ता मोजण्याच्या स्थानक परिसरात रस्त्याची कामे प्राधान्याने करणे | नवी मुंबई महानगरपालिका, एमआयडीसी , म.प्र.नि.मंडळ. |
| ६ | अ. दगडखाणी व स्टोन क्रशन यांनी करावयाची कारवाई | अ. सर्व दगडखाणी यांनी त्यांच्या उपलब्ध असलेल्या जमिनीवर खालील उपाययोजना करण्याचे निर्देश दिले.<br>1. वृक्षारोपण,<br>2. दोन पत्र्याचा वापर करुन दगडखाणींना आच्छादन करणे,<br>3. निरीच्या साहाय्याने केमिकल स्प्रेची उपाययोजना करणे, हे सर्व कालबध्द कार्यक्रमाव्दारे पूर्ण करणे. (डस्ट स्प्रेशन सिस्टीम) | दगडखाण असोसिएशन, नवी मुंबई/जिल्हाधिकारी मायनिंग विभाग |
| | ब. शासनाकडे जमा केलेल्या निधीचा पाठपुरावा करणे (गौण खनिज निधि) | शासनाकडे जमा असलेला गौण खनिज निधी, जिल्हाधिकारी मार्फत प्रस्ताव तयार करुन त्याचा वृक्षारोपण व पर्यावरणाचे रक्षण करण्याकरिता वापरण्यात यावा. व त्याकरता महानगरपालिका व सिडको प्रशासनाने पुढाकार घ्यावा. | जिल्हाधिकारी महानगरपालिका, सिडको, दगड खाणी व म.प्र.नि.मंडळ |
| ७ | उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत अहवाल | उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामगारांच्या आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबत वेळोवेळी म.प्र.नि.मंडळास अहवाल सादर करावा. | औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय (DISH) |
| ८ | कोळसा ऐवजी पर्यायी इंधन म्हणुन नॅचरल गॅसचा वापर | १ टीटीसी एमआयडीसी परिसरातील मोठे उद्योग व कोळसा हे इंधन वापर करणारे उद्योग यांनी प्रथम प्राधान्याने नॅचरल गॅसचा वापर करण्यास | महानगर गॅस लि., टीबीआयए-नवी मुंबई, प्रादेशिक अधिकारी, नवी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | निर्देश देण्यात यावेत. याकामी महानगर गॅस लि. यांनी सर्व संबंधित उद्योगांना पाईपलाईनव्दारे नॅचरल गॅस चा पुरवठा करणे, याबाबत प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांनी नियमित बैठक घ्याव्यात. | मुंबई/संबंधीत उद्योग |
| ९ | उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, तसेच सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा अद्यावत करणे | नवी मुंबई टीटीसी परिसरातील उद्योगांनी हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणा, तसेच सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा नविन तंत्रज्ञानाचा वापर करुन अद्यावत करणे | 1. नवी मुंबई टीटीसी परिसरातील उद्योग<br>2. ठाणे बेलापूर इंडस्ट्रिअल असोसिएशन, नवी मुंबई, संबंधीत उद्योग |
| १० | १७ अतिप्रदूषित वर्गीकरणातील समाविष्ट असणा-या उद्योगांनी यापूर्वी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार ऑन लाईन मॉनिटरींग सिस्टीम बसविण्याबाबत | १७ अतिप्रदूषित वर्गीकरणातील समाविष्ट असणा-या उद्योगांनी यापूर्वी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या निर्देशानुसार ऑन लाईन मॉनिटरींग सिस्टीम तीन महिन्यात बसविण्यात याव्यात. | संबंधीत उद्योग/ म.प्र.नि.मंडळ. |
| ११ | जे उद्योग कोळसा हे इंधन म्हणुन वापरतात, त्यांना पीएनजी वापरण्यासंदर्भात निर्देश देणे | टीटीसी परिसरातील जे उद्योग कोळसा इंधन म्हणुन वापरतात, त्याचे सर्वेक्षण करुन त्यांना पीएनजी वापरण्यास सक्ती करणे. | म.प्र.नि.मंडळ, महानगर गॅस लि., टि.बी.आय.ए. |
| १२ | ज्या दगडखाणी हवा प्रदूषण करतात व रहिवासी परिसराच्या जवळ आहेत, | टीटीसी परिसरातील स्टोन क्रशर यांनी दोन महिन्यामध्ये सक्षम हवा प्रदूषण यंत्रणा बसविणे व त्याचा वापर करणे | म.प्र.नि.मंडळ, संबंधीत दगड खाण |

- - - - - - -

उपस्थितांची यादी

१ सदस्य सचिव, म.प्र.नि.मंडळ

२ सह संचालक (हप्रनि)/ जप्रनि, सहायक सचिव (तांत्रिक), प्रादेशिक अधिकारी-मुख्यालय/ नवी मुंबई,

३ संचालक, औद्योगिक आरोग्य व सुरक्षा संचालनालय, नवी मुंबई

४ कार्यकारी अभियंता (पर्यावरण), नवी मुंबई महानगरपालिका

५ प्रादेशिक परिवहन अधिकारी, नवी मुंबई

६ कार्यकारी अभियंता, एमआयडीसी - ठाणे

७ व्यवस्थापक, महानगर गॅस लि.

८ अध्यक्ष, ठाणे बेलापूर इंडिस्ट्रिअल असोसिएशन (टीबीआयए)

९ टीटीसी एमआयडीसी उद्योगांचे प्रतिनिधी

१० अध्यक्ष, दगडखाण संघटना, नवी मुंबई व उद्योग प्रतिनिधी

- - - - - -

# MAHARASHTRA POLLUTION CONTRL BOARD

## Review meeting on Implementation of progress of Critically Polluted areas Action Plan—C.E.P.I.- Navi Mumbai

## Date:- 15/05/2015 at Conference Hall, HQ, MPCB, Mumbai

---

| Sr. No. | Name and Designation | Organization | Contact No. | Signature |
|---|---|---|---|---|
| 1. | Dr P. Anbalgan M.S | MS | | |
| 2. | Shri. V.M. Motghare JD(APC) | MPCB | | |
| | R. D. Singh | Sorotex/Akash | 9323645928 | |
| | H.B. Chichariya | NMMC | 7506193350 | |
| | S C Mulay | Lubrizol India | 9920586957 | |
| | Prashant R Sansare | Arkema Chemicals | 9930499822 | Sansa |
| | D.S. Hardas | Mazda Colors | 9969634449 | |
| | S.V. Bodhe | M/s Aminee & Plast Ltd | 9967069115 | |
| | A.C. Mohite | Zydus Takeda | 9594915994 | |
| | V.S. Narkhede | RPG Life Sciences | 982044773 | |
| | S.K. Pahuja | Shiv Shankar | 9619862766 | |
| | Yogesh Luddha | Henkel Adhesives | 9167748745 | |
| | Hanmant Saunkhe | USV Ltd. Nerul | 9867718993 | |
| | D.V. Modak | DY R TO Navi Mumbai | 9821344699 | |
| | S B Sawant | SOTL | 9969407340 | |
| | Threnia Joshy | Sony DADC | 9819366403 | |
| | Uday Lugade | Glenmark | 9619797952 | |

D. B. Gore — Industrial Safety & Health, Thane — 9969951317

Y. B. Sontakke — JD (WPC)

# MAHARASHTRA POLLUTION CONTRL BOARD

## Review meeting on Implementation of progress of Critically Polluted areas Action Plan—C.E.P.I.- Navi Mumbai

**Date:- 15/05/2015 at Conference Hall, HQ, MPCB, Mumbai**

---

| Sr. No. | Name and Designation | Organization | Contact No. | Signature |
|---|---|---|---|---|
| 1 | Nitin Karkar | Croda | 8879661165 | [signature] |
| 2. | R.M.Kedia | TBIA | 9323007125 | [signature] |
| . | S.R.HULE | NOCIL | 9324609927 | [signature] |
| 4. | M.R.DESAI | Zoetis pharmaceuticals | 9619182660 | [signature] |
| 5 | S.M. Joshi | BASF(India) limited | 9930648840 | [signature] |
| 6 | Dnyaneshwar Patil | Reliance Life sciences, Rabale | 7710001242 | [signature] |
| 7. | Krishnan Baiswan | Reliance Life Sciences, Rabale | 9967718426 | [signature] |
| 8 | Anthurose Mari | Reliance Life Sciences P Ltd | 8451811189 | [signature] |
| 9 | Sandeep Bhasale | CETP (T-B) | 9833149401 | [signature] |
| 10 | JAYADEVAN K | Thane Belapur Industries Assn | 9870118339 | [signature] |
| 11 | Prashant Surve | Sandoz Pvt Ltd Kalwe | 9029351389 | [signature] |
| 12 | Ulhas Thakur | SI group, Navi Mumbai | 9822260195 | [signature] |
| 13. | S.K. BISWAS | C/16/2 MIDC Alok Ind. Ltd Pawne | 9619952113 | [signature] |
| 14 | Kalpen Joshi | Modepro Ipvt | 9820606432 | [signature] |
| 15 | Suresh Vazirani | Hemmo Pharmaceuticals Pvt Ltd | 9820159482 | [signature] |
| 16 | P M. Sreevalsan | TTK Health Mgr | | [signature] |
| 17 | Nitin Kothari | TBIA | 9821230378 | [signature] |

# MAHARASHTRA POLLUTION CONTRL BOARD

## Review meeting on Implementation of progress of Critically Polluted areas Action Plan—C.E.P.I.- Navi Mumbai

## Date:- 15/05/2015 at Conference Hall, HQ, MPCB, Mumbai

---

| Sr. No. | Name and Designation | Organization | Contact No. | Signature |
|---|---|---|---|---|
| | D. V. Mhadalkar ARTO | Dy RTO Navi Mumbai | 9821244699 | [signature] |
| | | | | |
| | A R. Yeole | NMMC | 9561111212 | [signature] |
| | Tejesh Mahashte | Asian Paints | 9004440615 | [signature] |
| | AMIT S MATHURE | ASIAN PAINTS | 9820519930 | [signature] |
| | Shripad C Mulay | Lubrizol India | 9920536907 | [signature] |
| | Akhilesh Singh | Hindustan Platinum Pvt. Ltd. | 9769047722 | [signature] |
| | Sujay Sankar | MGL | 8879590013 | [signature] |
| | Rajesh Wagle | MGL | 9820190705 | [signature] |
| | N. S. Naik | MIDC | 9892732671 | [signature] |
| | R. S. Dinadkar | CETP THANE BELAPUR | 9821429717 | [signature] |
| | T. Neogi (Engg AHSES) | AKZO NOBEL | 9820800972 | [signature] |
| | Rakesh Ranjan | AKZONOBEL PACKAGING | 9920064962 | [signature] |
| | Namdeo Thawre Navi Mumbai | Navi Mumbai Assn. O. ASO | 9892377999. | [signature] |
| | N. Mhatre-Kamat | Navi Mumbai Quarry Assn. | 9820287980 | [signature] |
| | R. V. Patil Quarry President | Navi Quarry | 9322690618 | [signature] |
| | | | | |